**महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रात**
**जाहिराती/बॅनर्स/पोष्टर्स लावण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २००८/४५२/प्र.क्र.१५८/२००८/नवि-३२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक :-- १२ डिसेंबर, २००८**

**परिपत्रक**

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात, काही ठिकाणी लावण्यात आलेले पोष्टर्स, जाहिराती, बॅनर्स हे सामाजिक शांतता भंग करणारे, समाजाच्या विशिष्ट प्रवर्गातील नागरिकांच्या भावना दुखविणा-या असतात. परिणामी समाजात शांततेचा भंग होतो, समाजातील घटकात परस्परांमध्ये तेढ निर्माण होते व त्याचे रुपांतर अनुचित घटनांमध्ये होवू शकते. त्यामुळे अशा जाहिराती, बॅनर्स वा पोष्टर्स महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रात/हद्दीत लावण्यास परवानगी देण्यात येऊ नये. तसेच अशा प्रकारच्या जाहिराती/पोष्टर्स/बॅनर्स लावण्यास महानगरपालिका/नगरपालिका यांनी प्रतिबंध करावा.

महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रात असे आक्षेपार्ह जाहिराती/पोष्टर्स/बॅनर्स लावलेले आढळल्यास ते त्वरित काढून टाकण्यात यावेत. कोणत्याही जाहिरातींना परवानगी देताना समाजातील कोणत्याही प्रवर्गाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत तसेच सामाजिक शांताता भंग होणार नाही याची दक्षता घेऊनच परवानगी देण्याची कार्यवाही करावी. या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नांवाने,**

(फ. ब. खान)
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव,
अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव (नवि-१),नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव,अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
महापौर, सर्व महानगरपालिका,
अध्यक्ष, सर्व नगरपरिषदा/नगरपंचायत
आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, वरळी, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
आयुक्त सर्व महानगरपालिका,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती
निवडनस्ती (नवि-३२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

-------

Scanned with CamScan
Scanned with CamScan